# मार्गदर्शक सूचना
## योजनेचे नाव :- उद्यान पंडित २०१० पुरस्कार योजना

महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती, जमिनीची प्रत व हवामानातील विविधता यामुळे फलोत्पादनास मोठा वाव आहे. फलोत्पादनांतर्गत भाजीपाला पिके, फळपिके, फुलपिके, मसाला पिके , औषधी व सुगंधी वनस्पती पिके यापासून शेतक-यांना मोठया प्रमाणावर आर्थिक लाभ होतो. गेल्या काही दशकात आहाराबाबतच्या वाढत्या शास्त्रीय दृष्टीकोनामुळे फळे व भाजीपाला यासारख्या पोषणयुक्त असणा-या पिकांना अधिक महत्व प्राप्त होत आहे. पारंपारिक पीक पध्दतीपेक्षा फलोत्पादन पिकापासून अधिक लाभ होत असल्यामुळे शेतक-यांच्या आर्थिक उन्नतीसाठी फलोत्पादनास प्रोत्साहन देण्यात येत आहे.

वाढते शहरीकरण, त्यामुळे फलोत्पादनास वाढती मागणी याबरोबरच निर्यात संधीचा विचार करता शेतक-यांमध्ये याबाबत मोठया प्रमाणावर जागृती निर्माण करुन दर्जेदार उत्पादन वाढ व मुल्यवर्धनासाठी प्रेरणा निर्माण करावी लागणार आहे. देशाच्या आर्थिक विकासात फलोत्पादनाचे वाढते महत्व लक्षात घेता जागतिक बाजारपेठेत फलोत्पादन विकास कार्यक्रम अधिक स्पर्धाक्षम बनविणे क्रमप्राप्त झाले आहे.

कृषि क्षेत्रात डॉ पंजाबराव देशमुख कृषिरत्न,वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी इत्यादी प्रकारची पारितोषिके देऊन शेतक-यांचा गौरव करण्यात येतो. याच धर्तीवर फलोत्पादन क्षेत्रामध्ये आधुनिक पध्दतीने उल्लेखनिय कामगिरी करणा-या शेतक-यांना प्रोत्साहित करणे आवश्यक असून त्यांचा पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन गौरव केल्यास फलोत्पादन क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी स्पर्धा निर्माण होईल व फलोत्पादन उत्पादक शेतक-यांना प्रोत्साहन मिळेल त्यादृष्टीने उद्यान पंडित पुरस्कार योजना सन २००१-०२ पासून राबविण्यात येत आहे. फलोत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे शेतक-यांचा गौरव करण्यासाठी राज्यात **सन २०१० करिता उद्यान पंडीत पुरस्कार देण्याची योजना** सन २०१०-११ मध्ये राबविण्याचे शासनाचे विचाराधीन आहे. राज्यात प्रत्येक विभागातून पुरस्कार देण्यात येणार आहेत. या पुरस्कारामध्ये रु.१५०००/- रोख बक्षिस रक्कम, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र देण्याचे प्रस्तावित आहे.

**१ योजनेचे उद्देश :-**

१.१ फलोत्पादनाबाबत शेतक-यांमध्ये जागृती निर्माण करणे व गुणात्मक दर्जा वाढविणे.

१.२ शेतक-यांना फलोत्पादन क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहित करणे.

१.३ फलोत्पादनामध्ये आधुनिक तंत्रज्ञान व नाविन्यपुर्ण उपक्रम (नवीन जाती, वैशिष्टपूर्ण व्यवस्थापन, सूक्ष्मसिंचन, हाय डेन्सिटी प्लॅन्टेशन, छाटणी व बहार धरणे इ.) वापरास चालना देणे.

१.४ फलोत्पादन आधारीत उपक्रम उदा. रोपवाटिका, हरितगृह, निविष्ठा उत्पादन, सेंद्रिय तंत्रज्ञानाचा अवलंब, साठवणुक, वाहतुक, मुल्यवर्धन, प्रक्रिया, पणन, निर्यात इ. काढणीत्तोर तंत्रज्ञानास चालना देणे

**२. पुरस्कारासाठी पात्र व्यक्ती :-**

उद्यान पंडित स्पर्धेसाठी फलोत्पादन क्षेत्रात भरीव काम करणारे शेतकरी पात्र राहतील.

## ३. अटी व शर्ती –

३.१ पुरस्कारासाठी निवडावयाचा शेतकरी हा स्वतः शेती करणारा शेतकरी असावा तो आधुनिक पध्दतीने फलोत्पादन (फळे, भाजीपाला, फुले, मसाला पिके, सुगंधी औषधी वनस्पती इ.) पिकांचे उत्पादन घेणारा असावा त्याचे या क्षेत्रात उल्लेखनिय योगदान असावे.

३.२ फलोत्पादनातंर्गत यशस्वी उत्पादन,रोपवाटिका, बीजोत्पादन,सेंद्रिय निविष्ठा उत्पादन व वापर, काढणीत्तोर व्यवस्थापन, प्रतवारी, पॅकहाऊस, साठवणुक, मुल्यवर्धन, प्रक्रिया, विपणन, निर्यात इ. कार्यात सहभागी होऊन उल्लेखनीय कार्य करणारा व अधिक नफा मिळविणारा असावा.

३.३ पुरस्कारासाठी निवडावयाचा शेतकरी हा आधुनिक पध्दतीच्या फलोत्पादन शेती पध्दती, काढणीत्तर व्यवस्थापन, पणन, निर्यात इ.बाबत परिसरातील शेतक-यांना मार्गदशन करणारा असावा. याबरोबरच फलोत्पादन संबंधी , विविध स्पर्धा, प्रदर्शन, मेळावे, संशोधन संस्थांना भेटी इ. उपक्रमामध्ये सहभागी होणारा आणि फलोत्पादन तंत्र प्रचार व प्रसार कार्यात सहभागी होणारा तसेच परिसरातील शेतक-यांना अशा उपक्रमांत सहभागासाठी उद्युक्त करणारा असावा. फळपिक स्पर्धा, प्रदर्शने इ. मधील सहभाग / पारितोषिक इ. चा तपशील प्रस्तावासोबत पुराव्यासह देण्यात यावा.

३.४ शिफारस करावयाच्या शेतकरी हा गावात व परिसरात प्रगतीशिल व आदर्शवत म्हणून ओळखला जात असावा व त्यासाठी त्यांनी स्वतःचे कष्ट, कल्पकता, नवे उपक्रम राबविले असणे महत्वाचे आहे व त्याचा फायदा परिसरातील लोकांना झालेला असावा.

३.५ पुरस्कारासाठी निवडावयाचा शेतकरी हा स्वतः फलोत्पादन पिके घेणारा असावा ही प्रमुख अट असल्याने प्रस्तावित शेतक-याच्या नांवे शेती असावी यासाठी प्रस्तावासोबत जमिनीचे सर्व कागदपत्रे जसे ७/१२ व ८-अ उतारा सादर करणे आवश्यक आहे. सदरचा उतारा हा प्रामुख्याने जुलै २०१० ते जुलै २०११ या कालावधीतील असावा. तसेच अशा उता-यांवर प्रस्ताव तपशिल अनुषंगाने फलोत्पादन पिकांच्या नोंदी असणेही आवश्यक आहे.

३.६ फलोत्पादन शेतकरी कोणत्याही कर्जाबाबत थकबाकीदार नसावा. याबाबतचा पुरावा सोबत जोडावा.

३.७ शेतकरी एखाद्या शासन पुरस्कृत संस्थेकडून अगर शासनाकडून मानधन किंवा वेतन किंवा निवृत्ती वेतन घेत नसावा.

३.८ चारित्र्य निर्दोष असलेबाबत पोलीस अधिक्षक यांचा दाखला इत्यादि सर्व कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

३.९ प्रस्तावासोबत विहित प्रपत्रातील प्रमाणपत्रे व प्रस्ताव तपशिलात नमूद विविध उपक्रमांसंबंधी छायाचित्रे, व वर्तमानपत्रातील बातम्या / प्रसिध्दीबाबतच्या सत्य प्रती जोडणे आवश्यक आहे.

३.१० प्रस्तावामध्ये मागील तीन वर्षात घेतलेली फलोत्पादन पिके व त्यापासून मिळालेले उत्पन्न आणि नफा याबाबतची भौतिक व आर्थिक माहिती द्यावी.

३.११ कृषि विभागामार्फत यापुर्वी डॉ पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार मिळालेले शेतकरी उद्यान पंडीत पुरस्कारासाठी पात्र नाहीत.

३.१२ प्रस्तावासोबत शेतक-याने अल्प परिचय स्वतंत्ररित्या सविस्तर देणे आवश्यक आहे.

**४.	योजना राबविण्याची पध्दत :-**

**४.१	जिल्हास्तर:-**

**४.१.१** सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांचे स्तरावरुन योजनेला स्थानिक वृत्तपत्रांव्दारे व्यापक प्रमाणावर प्रसिध्दी द्यावी. तसेच योजनेच्या मार्गदर्शक सुचना तालुका व मंडळ स्तरापर्यंत उपलब्ध करुन देवुन प्रस्ताव जिल्हा स्तरावर प्राप्त करुन घेण्यात यावेत.

**४.१.२** जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर प्रस्तावाची छाननी करुन आवश्यक कागदपत्रे प्रमाणपत्रे फोटो याबाबत पूर्तता करुन घ्यावी. तसेच प्रस्ताव तपशिल अनुषंगाने किमान वर्ग-१ अधिका-याचे (उपविभागीय कृषि अधिकारी/ जिल्हा कृषि उपसंचालक/ कृषि विकास अधिकारी ) मार्फत अहवाल व प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावी. प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे. वर्ग-१ अधिका-याने प्रस्तावातील शेतक-याचे शेतास भेट देऊन प्रस्तावात नमूद माहिती बरोबर असल्याची खातरजमा करावी. तसेच प्रस्तावातील नमूद साधनसामुग्रीचा (निविष्ठा उत्पादन युनिट,आधुनिक शेती अवजारे व मशिनरी, फवारणीयंत्र, हरितगृह, पॉलीहाऊस, पॅकहाऊस साठवणूक केंद्र, प्रक्रिया केंद्र इ.) वापर चालू असल्याची अहवालात नोंद करण्यात यावी. याबरोबरच प्रक्रिया, पणन व निर्यात अनुषंगाने आवश्यक कागदपत्राची पडताळणी करुन प्रस्तावात नमूद माहितीची अहवालात नोंद करण्यात यावी. आणि त्यासंबंधीचा दिनांकित अहवाल व विहीत प्रमाणपत्र जिल्हा कार्यालयांस वेळेतच सादर करावे.

**४.१.३** जिल्हा स्तरावर प्राप्त करुन घेण्यात आलेल्या प्रस्तावांची वरीलप्रमाणे व या पत्रातील सूचनानुसार पडताळणी करुन प्राप्त प्रस्ताव शिफारशीसह व परिचय लेखासह विभागीय कृषि सहसंचालक यांचेकडे पाठविण्यात यावेत.

**४.२	विभागस्तर :-**

४.२.१ विभाग (संभाग) स्तरावर प्राप्त होणा-या प्रस्तावांची छाननी व शिफारस करण्यासाठी आणि प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी विभागीय स्तरावर खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | विभागीय कृषि सहसंचालक | अध्यक्ष |
| ब) | विभागीय कार्यालयातील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य सचिव |
| क) | संभागातील सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य |
| ड) | कृषि विद्यापिठातील विभाग प्रमुख (उद्यान विद्या ) | सदस्य |

४.२.२ संभागस्तरावरील समितीने प्राप्त सर्व प्रस्तांवाची बैठकीमध्ये छाननी करून **सर्व प्रस्ताव अभिप्रायासह प्राधान्यक्रम देवून** कृषि आयुक्तालयास पुढील कार्यवाहीसाठी वेळेतच बैठक इतिवृत्तासह दोन प्रतीत सादर करावेत.

प्रस्ताव अनुषंगाने प्रपत्र अ मधील विहीत अर्ज, विविध प्रमाणपत्रे आणि तपासणी सूची (चेकलिस्ट) बाबतची प्रपत्रे पुढीलप्रमाणे आहेत.

## प्रपत्र - अ

## उद्यान पंडीत योजनेंतर्गत प्रस्तावित शेतक-याची माहिती

| अ.क्र | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | **शेतक-याचे संपुर्ण नाव** | |
| २ | कायमचा पत्ता<br>गाव / पोष्टाचे नाव<br>तालुका<br>जिल्हा | |
| ३ | पत्र व्यवहाराचा सविस्तर पत्ता<br>गाव / पोष्टाचे नाव<br>तालुका<br>जिल्हा | |
| ४ | संपर्काचा दुरध्वनी क्र.(एसटीडी कोडसह)/भ्रमणध्वनी क्र/ ई-मेल पत्ता | |
| ५ | अ) जन्म तारीख<br>ब) वय (पुर्ण वर्ष) | |
| ६ | मागास वर्गीय, अनुसुचित जाती, जमाती, भटक्या / विमुक्त जातीपैकी असल्यास तपशील (दाखला सोबत जोडावा) | |
| ७ | शैक्षणिक पात्रता (दाखला सोबत जोडावा) | |
| ८ | सोबत जिल्हा पोलीस अधिक्षक यांचा चारीत्र्य दाखला जोडला आहे काय ? | |
| ९.१ | **अ)** अर्जदाराचे नांवे एकूण धारण केलेले क्षेत्र (८ अ प्रमाणे हेक्टरमध्ये)<br>ब) कुंटुंबातील सदस्याचे नांवे, कराराने / खंडाने वहिती करत असलेले क्षेत्र (तपशिल सोबत जोडावा)<br>क) एकूण कसत असलेले क्षेत्र | |
| ९.२ | मागील तीन वर्षात घेतलेली फलोत्पादन पिकांची नांवे<br>१) फळपिके-<br>२) भाजीपाला पिके<br>३) फुलपिके / इतर पिके | |
| ९.३ | सन २०१०-११ मधील पिकनिहाय क्षेत्र व उत्पन्न<br>**(फळपिक, भाजीपाला, फुले, मसाला पिके, औषधि सुगंधी वनस्पती, रोपवाटिका या क्रमाने)**<br>अ.क्र. पिक क्षेत्र (हेक्टर) उत्पादन (क्विटल) उत्पादकता (क्वि/हे) उत्पन्न (रु.हजारात) निव्वळ नफा (रु.हजारात)<br>(१)<br>(२)<br>(३) | |
| ११ | फलोत्पादनामध्ये विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामाचा संक्षिप्त गोषवारा. | |

| | | |
|---|---|---|
| **१२** | मागील ३ वर्षातील उत्पन्न व निव्वळ नफा (आकडे हजारात) | |
| | सन प्रमुख फलोत्पादन पिके एकूण उत्पन्न **निव्वळ नफा** | |
| | २००८-०९ | |
| | २००९-१० | |
| | २०१०-११ | |
| **१३** | मातीचे नमूने तपासून त्याप्रमाणे रासायनिक खतांचा वापर करतात काय? | |
| **१४** | सिंचनासाठी ठिबक/तुषार पध्दतीचा वापर असल्यास तपशिल | |
| **१५** | कोरडवाहू शेती तंत्रज्ञानाचा वापर व प्रचाराबाबत तपशील | |
| **१६** | उच्च तंत्रज्ञानावर आधारीत प्रकल्प राबवित असल्यास तपशील | |
| **१७** | पिक काढणीत्तोर तंत्रज्ञान (प्रतवारी ,प्रक्रिया व साठवणूक) चा वापर करत असल्यास तपशिल | |
| **१८** | उत्पादित मालाची विक्री बाबतचा तपशिल | |
| **१९** | कृषि विद्यापीठे /कृषि प्रतिष्ठान व तत्सम संस्थांना भेटी देवून तेंथील तंत्रज्ञानाच्या अवलंबनाबाबतचा तपशिल. | |
| **२०** | शेती विषयक उपलब्ध पुस्तके /मासिके | |
| **२१** | कर्जाची थकबाकी किती ? प्रकार (रुपयात)<br>१) राष्ट्रीयकृत बॅंक<br>२) सहकारी बॅंक<br>३) सरकारी तगाई | |
| **२२** | पीक स्पर्धेत मिळालेल्या बक्षिसांचे प्रकार, कोणत्या वर्षी, त्यात काढलेले हेक्टरी उत्पन्न किती याचा तपशील | |
| **२३** | कृषि विभागामार्फत यापुर्वी मिळालेल्या पुरस्काराचा तपशिल | |
| **२४** | संस्थेचे पदाधिकारी आहात काय ? असल्यास त्याचा तपशिल द्यावा. | |
| **२५** | इतर नाविन्यपुर्ण बाबींचा तपशील जसे सामाजिक कार्य/पर्यावरण विषयक / स्वयंसहाय्यता गट /शेतकरी महिला गट/शेती अनुषंगाने लिखाण व प्रकाशने इ. | |
| **२६** | शासन / शासन पुरस्कृत संस्थेमार्फत वेतन / निवृत्ती वेतन मिळत असल्यास तपशिल | |

**स्वाक्षरी**
**तालुका कृषि अधिकारी**

**स्वाक्षरी**
**शेतकरी / व्यक्ती /संस्था**

**स्वाक्षरी**

**उपविभागीय कृषि अधिकारी**

**स्वाक्षरी**

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या वर्ग -१ अधिकारी यांचे उद्यान पंडित पुरस्कारासाठीचे प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री./सौ./श्रीमती -----------------------------रा.------------------ ता.------------------जि. -----------------यांची दि. -------------रोजी मी स्वतः प्रत्यक्ष क्षेत्रिय पाहणी केली असता प्रस्तावात नमुद केलेल्या प्रपत्र- अ प्रमाणे नमूद माहितीबाबत सविस्तर अहवाल सोबत जोडला आहे. सबब त्यांची उद्यान पंडित पुरस्कारासाठी शिफारस करण्यात येत आहे.

**दि. / /२०११** **वर्ग -१ अधिका-याची सही**

**ठिकाण -** **नांव ::**

**पदनाम शिक्का**

-------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**शासन / पुरस्कृत संस्थेकडून मानधन / वेतन घेत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री./सौ./श्रीमती ------------------------------------------ रा. ---------------- ता. ---------------------जि. ---------------------हे कोणत्याही शासन / शासन पुरस्कत संस्थेकडून मानधन/ निवृत्तीवेतन घेत नाहीत.

**दि. / /२०११** **तालुका कृषि अधिका-याची सही**

**ठिकाण-** **पदनाम शिक्का**

## महाराष्ट्र शासन कृषि विभागामार्फत पुरस्कार मिळाला नसल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री./सौ./श्रीमती ---------------------------------------------- रा. ---------------------- ता. ----------------------जि. ----------------------शेतकरी यांना महाराष्ट्र शासन कृषि विभागामार्फत डॉ पंजाबराव देशमुख कृषिरत्न,वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र,, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी इ.पुरस्कार मिळालेला नाही.

**दि. / /२०११** **कृषि विकास अधिका-याची सही**

**ठिकाण-** **नांव ::**

**पदनाम शिक्का**

---

## मानधन / निवृत्ती वेतन घेत नसल्याचे व कर्जाबाबत थकबाकीदार नसल्याबाबतचे शेतक-यांचे प्रतिज्ञापत्र

मी श्री./ सौ./श्रीमती -------------------------------------रा. ---------------------- ता.---- ------------ जि.---------------------- आज रोजी प्रतिज्ञापत्र लिहून देतो की,

१. मी शासनाकडून/शासन पुरस्कृत संस्थेकडून मानधन / निवृत्तीवेतन घेत नाही.

२. मी कोणत्याही अर्थसहाय्य करणा-या (बँका /पतसंस्था इत्यादीचा) संस्थेचा आज रोजी थकबाकीदार नाही.

वरील माहिती ही खरी व बरोबर आहे. या प्रतिज्ञापत्रातील माहिती चुकीची आढळल्यास माझ्याविरुध्द होणा-या पुढील कारवाईस मी पात्र राहील याची मला जाणीव आहे.

**शेतक-याची स्वाक्षरी**

**दि. / /२०११**

**ठिकाण-**

# प्रमाणपत्र

श्री. ----------------------------------------------------------------रा. ----------------------------

पो. -----------------------ता. -----------------------जि. ---------------------यांना उद्यान पंडीत पुरस्काराचे संदर्भात पोलीस चारित्र्य तपासणी प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने तसा अर्ज त्यांनी या कार्यालयास सादर केला आहे.

त्या अनुषंगाने पोलीस स्टेशन अधिकारी, यांचे मार्फत चौकशी करविली असता त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन अभिलेखावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा, दंड अथवा शिक्षेची नोंद नाही. तसेच त्यांचा कोणत्याही घातपाती कृत्याशी किंवा राजकिय पक्षाशी संबंध नाही.

करीता पोलीस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

जिल्हा पोलीस अधिक्षक,

दि.   /   /२०११ नांव ::

ठिकाण (शिक्का)

_

**उद्यान पंडीत पुरस्कार :- २०१०**

**शेतक-यांचे नांव :-**

**पत्ता :-**

**तपासणी सूची (चेकलिस्ट)**

| **अ.क्र.** | **बाब** | **प्रस्तावातील पृष्ठ क्रमांक** |
|---|---|---|
| **१** | विहित नमुना | |
| **२** | ८ अ चा उतारा | |
| **३** | प्रस्तावात नमुद फळपिकांखालील जमीनीचे उतारे ७/१२ | |
| **४** | ७/१२ उता-यावर फलोत्पादन पिकांची नोंद आहे काय ? | |
| **५** | शेतक-याचे ओळखपत्राच्या आकाराचे तीन फोटो (फोटोंचे मागील बाजूस नाव, पत्ता व दूरध्वनी/भ्रमणध्वनीसह) | |
| **६** | मानधन/ निवृत्तीवेतन घेत नसल्याचे तसेच कोणत्याही कर्जाबाबत थकबाकीदार नसल्याचे शेतक-याचे प्रतिज्ञापत्र (पुरावे असल्यास द्यावेत) | |
| **७** | मानधन / वेतन / निवृत्ती वेतन मिळत नसल्याबाबत तालुका कृषि अधिकारी यांचे प्रमाणपत्र | |
| **८** | जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी दिलेला सन २००९-१० चा चारित्र्याचा दाखला | |
| **९** | यापुर्वी कृषि पुरस्कार न मिळाल्याबाबतचे कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचे प्रमाणपत्र | |
| **१०** | वर्ग १ अधिका-याने प्रत्यक्ष भेट देवुन दिलेला अहवाल व विहीत प्रमाणपत्र | |
| **११** | जिअकृअ कार्यालयाचा शेतकरी परिचय लेख (सीडीसह) | |
| **१२** | विभाग (संभाग) स्तरीय समितीची<br>१. शिफारस<br>२. इतिवृत्त | |